International Journal for Multidisciplinary Research (IJFMR)
E-ISSN: 2582-2160 ● Website: www.ijfmr.com ● Email: editor@ijfmr.com

# ग्रामीण व शहरी भागातील युवतींच्या जोडीदाराविषयीच्या अपेक्षा

**प्रा. डॉ. मिनाक्षी पांडुरंगसा बोरीवाले**

गृहविज्ञान विभाग, श्री योगानंद स्वामी कला महाविद्यालय, वसमत

**सारांश (Abstract) :**

विवाहासाठी जोडीदार निवड ही अत्यंत महत्वाची बाब आहे. प्रत्येकाला मनाप्रमाणे जोडीदार मिळावा असे वाटते, जोडीदाराची निवड करताना प्रत्येक युवतीच्या मनात आपल्या जोडीदाराविषयीची स्वप्ने रंगलेली असतात. यात आपला जोडीदार सुंदर, सुशिक्षीत, होतकरू, नैतीकता जपणारा, सामाजिक प्रतिष्ठा असलेला असावा असे प्रत्येकालाच वाटते, प्रस्तुत संशोधन हे किशोरवयीन युवतींच्या जोडीदाराच्या सौंदर्य विषयक अपेक्षा अभ्यासण्यासाठी आयोजीत करण्यात आले. सदरील अभ्यासासाठी नांदेड जिल्यातील ग्रामीण व शहरी भागातील 18 ते 25 वर्षे वयोगटातील विविध महाविदयालयातील 250 युवतींची यादृच्छिक नमूना निवड पध्दतीद्वारे नमुना म्हणून निवड केली गेली. यात संशोधनासाठी आवश्यक असणारी युवतींची व त्यांच्या कुटुंबाची प्राथमिक माहिती आणि जोडीदार निवडीच्या अपेक्षाची संबंधीत माहिती संशोधकाने स्वतःतयार केलेल्या प्रश्नावली द्वारे युवतीकडून संकलीत केली. संकलीत केलेल्या माहितीचे विश्लेषण सारणीमध्ये वारंवारता व टक्केवारी द्वारे सादर करण्यात आले. सदरील संशोधनातून युवतींनी जोडीदाराच्या व्यक्तीमत्व विकासास प्राधान्य दिले असून सौंदर्य म्हणून युवती जोडीदाराच्या रंगाला प्राधान्य देत नाहीत व त्यांना त्यांच्या पेक्षा देखणा जोडीदार नसावा अशा अपेक्षा व्यक्त केल्या.

**बिज संज्ञा (Key word ) :** जोडीदार निवड, व्यक्तीमत्व विकास, जोडीदाराचे सौंदर्य इत्यादी.

## 1.प्रस्तावना (Introduction) :

जोडीदार निवड ही पारंपारिक प्रक्रिया आहे. ज्यात ही निवड एखादया व्यक्तीची सामाजिक पार्श्वभूमी, वंश, रंग, स्थिती परंपरा, चालीरीती, धार्मिक नियम आणि इतर घटकांच्या आकर्षनावर अवलंबून असते. आपला जोडीदार कसा असावा याबाबत प्रत्येकांच्या वेगवेगळ्या अपेक्षा असतात आणि काळानुरूप त्या बदलतातही. सहजीवनातील जोडीदार नेमका कसा असावा याबाबत जोडीदाराची निवड करत असतांना अनेक निकषांचा विचार केला जातो. बाहय सौंदर्य धर्म, जात,वय,शिक्षण, इत्यादी बाबी लक्षात घेतल्या जातात. तसेच आर्थिक स्थिती,

समाजातील स्थान, कुटुंबातील सभासदांची तसेच समाजातील इतर सदस्यांची अनुमती हे सर्व घटक देखिल महत्वाची भूमिका बजावतात. विवाहापूर्वी जोडीदाराकडून आपल्याला काय अपेक्षा आहेत याचा जाणीवपूर्वक विचार युवतींनी करायला हवा. हे पथ्य जसे ठरवून केलेला विवाहाला लागू पडते तसेच प्रेमविवाहांनाही लागू पडते. अनेकदा असे दिसून येते की, विवाहाने युवक व युवतींच्या आयुष्याची दिशा पूर्णपणे बदलु शकते. याची पुरेशी जाणीव युवक व युवतींना नसते. त्यामुळे जोडीदारात काय हवे आहे याचा अजीबातच विचार केलेला नसतो. अशावेळी अनेकदा युवकांचे बाहयरूप, आर्थिक स्थिती यांनी हुरळून जाऊन विवाह केला जातो तेव्हा क्षणीक आकर्षणाला बळी पडून घाईने निर्णय न घेता विचारपूर्वक, अपेक्षेनुसार जोडीदाराची निवड केली तर भविष्यातील अनर्थ टळू शकेल. यासाठी कुटूंबाने आपल्या अपत्यांच्या त्यांच्या जोडीदाराविषयीच्या असणाऱ्या अपेक्षा जाणून घ्यायला हव्यात.

जोडीदार निवडत असताना प्रत्येकाला स्वतःला अनुरूप जोडीदार मिळावा असे वाटते. युवकांच्या बाबतीत सांगावयाचे झाल्यास त्यांना त्याच्या पेक्षा देखणा जोडीदार हवा असतो, पण युवतींना त्यांच्यापेक्षा देखणा जोडीदार हवा आहे का नाही याबाबत युवतीसोबत चर्चा करणे आवश्यक आहे. अनेक युवतींना त्यांचा जोडीदार कल्पनेतील जोडीदारासारखा, एखादया सिरीअल मधील नायका सारखा असावा वाटतो पण प्रत्यक्षात त्यांच्या अपेक्षा पूर्ण होतीलच असे नाही. तेव्हा कल्पनेतील जोडीदारापेक्षा वास्तव परिस्थितीनुसार अपेक्षा ठरवून जोडीदार निवड करणे आवश्यक आहे.

**2.उदिष्टे :**

1. जोडीदार निवडत असताना – युवती जोडीदाराच्या सौंदर्याला प्राधान्य देतात का हे माहित करून घेणे.

**3.संशोधन पद्धती :**

सदरील संशोधनासाठी ग्रामीण व शहरी भागातील 18 ते 25 वर्षे वयोगटातील 250 युवतींची कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातून नमुना म्हणून निवड करण्यात आली.

**4.नमूना निवडीचे तंत्र :**

सदरील संशोधनासाठी नांदेड शहर व नांदेड ग्रामीण भागातून 250 युक्तींची यादृच्छिक नमूना निवड पद्धतीवारे निवड केली गेली. नमुना निवडीचे निकष खालील प्रमाणे आहेत.

1. नांदेड शहर व नांदेड ग्रामीण भागातील युवतींचीच नमुना निवड म्हणून निवड करण्यात आली.
2. वरिष्ठ आणि कनिष्ठ महाविदयालयीन युवतींचा अभ्यास करण्यात आला.

**5.तथ्य संकलन :**

1. प्रस्तुत संशोधनासाठी आवश्यक असणारी माहिती संशोधकाने स्वतः तयार केलेल्या प्रश्नावली व मुलाखत या प्राथमिक साधन सामग्रीद्वारे संकलीत केली गेली.
2. संकलित केलेल्या तथ्यांचे टक्केवारी व वारंवारताच्या साहयाने विश्लेषण करण्यात आले.

**6.निष्कर्ष :**

प्रस्तूत संशोधन हे नांदेड शहर व नांदेड ग्रामीण भागापुरतेच मर्यादित आहे. यासाठी 18 ते 25 वर्षे वयोगटातील 250 महाविद्यालयीन युवतीची यादृच्छिक नमूना निवड पद्धती द्वारे निवड केली गेली. संशोधकाने स्वतः तयार केलेल्या प्रश्नावली द्वारे तथ्यांचे संकलन केले व त्या तथ्यांचे विश्लेषण पुढील प्रमाणे केले आहे.

**जोडीदार निवडताना त्याच्या व्यक्तीमत्व विकासास प्राधान्य देण्यासंबंधीची प्रतिक्रिया**

| **जिल्हे** | **नांदेड** | | | |
|---|---|---|---|---|
| **पर्याय** | **ग्रामीण** | **टक्के** | **शहरी** | **टक्के** |
| होय | 83 | 66.4 | 87 | 69.6 |
| नाही | 42 | 33.6 | 38 | 30.4 |
| एकूण | 125 | 100 % | 125 | 100 % |

**जोडीदार निवडताना सौंदर्य म्हणून रंगाला प्राधान्य देण्यासंबंधीची प्रतिक्रिया**

| **जिल्हे** | **नांदेड** | | | |
|---|---|---|---|---|
| **पर्याय** | **ग्रामीण** | **टक्के** | **शहरी** | **टक्के** |
| होय | 31 | 24.8 | 39 | 31.2 |
| नाही | 94 | 75.2 | 86 | 68.8 |
| एकूण | 125 | 100 % | 125 | 100 % |

**तुम्हाला तुमच्यापेक्षा देखणा जोडीदार हवा आहे का यासंबंधीची उत्तरदात्यांच्या प्रतिक्रिया**

| **जिल्हे** | **नांदेड** | | | |
|---|---|---|---|---|
| **पर्याय** | **ग्रामीण** | **टक्के** | **शहरी** | **टक्के** |
| होय | 21 | 16.8 | 29 | 23.2 |
| नाही | 55 | 44 | 53 | 42.4 |
| असे काही नाही / तटस्थ | 49 | 39.2 | 43 | 34.4 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| एकूण | 125 | 100 % | 125 | 100 % |

संकलीत केलेल्या तथ्यावरून असे निदर्शनास येते कि, नांदेड जिल्हयातील ग्रामीण भागातून 66.4 टक्के युवतींनी व शहरी भागातून 69.6 टक्के युवतींनी जोडीदाराच्या व्यक्तिमत्व विकासास अधिक प्राधान्य दिले आहे. जोडीदार निवडत असताना नांदेड जिल्हयातील ग्रामीण भागातील 75.2 टक्के व शहरी भागातील 68.8 टक्के युवतींनी जोडीदाराच्या रंगाला सौंदर्य म्हणून प्राधान्य दिले नसून नांदेड जिल्हयातील ग्रामीण भागातील 44 टक्के व शहरी भागातील 42.2 टक्के युवतींना जोडीदार त्यांच्यापेक्षा देखणा नकोय.

**सारांश :**

केवळ रंग गोरा असेल म्हणून प्रत्येक व्यक्ती सुंदर असेलच असे नाही तेव्हा युवतींनी जोडीदाराच्या सौंदर्य विषयक अपेक्षा ठरवत असताना त्यांनी जोडीदाराच्या रंगाला प्राधान्य देण्यापेक्षा त्याच्या व्यक्तिमत्वास प्राधान्य दिले असून युवतींना त्यांच्या पेक्षा देखणा जोडीदार नकोय अशा अपेक्षा व्यक्त केल्या गेल्या.

**संदर्भसूची (References) :**

1. वाखरडे, प्रा. सोनाली (2012) मुलभूत सामाजिक संस्था, लातूर अरुणा प्रकाशन, पृष्ठ -107
2. कम्पोर्क, दा.धों., सामाजिक समुह आणि सामाजिक संस्था, औरंगाबाद, कैलाश पब्लीकेशन, प्रथम आवृत्ती, 1997 पृष्ठ -८५-९७
3. https://en.m.wikipedia.org
4. https://onlinejibrary.wiley.com